# राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पदभरती जाहिरात

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, धुळे

### सन २०२३-२४ खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत

| Sr. | Post | Post | Education Details | Monthly Honorarium |
|---|---|---|---|---|
| १ | Staff Nurse (Female) | ५ | GNM/ Bsc Nursing | रु.२०,०००/- |
| २ | Staff Nurse (Male) | १ | GNM/ Bsc Nursing | रु.२०,०००/- |
| ३ | MPW (Male) | ६ | 12th In Science + Paramedical Basic Training Course Or Sanitary Inspector Course | रु. १८,०००/- |

| Sr. No | Post | Vacancy Matrix | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | General | Female | Ex-Service | Sports man | Project Affected | Part Time Employees | Disabled Person |
| 1 | Staff Nurse (Female) | SC-1, ST-1, VJ-1, OBC-1, SEBC-1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | Staff Nurse (male) | Open-01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | MPW (Male) | SC-1, ST-1, VJ-1, OBC-1, SEBC-1, EWS-1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

अटी व शर्ती :-

१) उपरोक्त पदे हि कंत्राटी अंत्यत तात्पुरत्या स्वरुपाची असुन नियुक्ती माहे ३० जुन २०२४ अखेर राहील. व शासनाने सदर पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/कर्मचारी यांचे निवड झालेस सदर पदांकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणमध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.,धुळे यांनी राखुन ठेवले आहेत.

७) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

८) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

९) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

१०) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

११) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्ग ४३ वर्ष राहील.

१२) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया हि प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

१३) शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१४) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळवण्याची मागणी करता येणार नाही.

१५) उपरोक्त पदापैकी तांत्रिक पदांकरीता, स्टाफ नर्स, औषध निर्माता, वैदयकिय अधिकारी ई. पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकरता राहील. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१६) भरती प्रक्रिया स्थगीत करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेस बदल करण्याचे सर्व अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालीही दावा करता येणार नाही.

१७) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय आवार, साक्री रोड धुळे येथे दि.१५/०३/२०२४ ते दि.२६/०३/२०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत शासकीय सुटीचे दिवस वगळुन व्यक्तीशः सादर करावेत.

१८) मुलाखतीकरता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही. तसेच एक कोरा लिफाफा ज्यावर रु.५/- टपाल तिकीट लावुन अर्जासोबत जोडावा.

१९) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १५०/- व राखिव प्रवार्गातील उमेदवारांनी रु. १००/- चा डिमांड ड्राप्ट "District Integrated Health & Family Welfare Society Dhule" या नावे देय असावा.

२०) सदरहु भरती प्रक्रियेकरीता अर्ज दि.२६/०३/२०२४ अखेर राहणार असुन तदनंतर छाननी, लेखी परिक्षा/मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी mahaarogya.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यांसाठी येऊ नये

खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.

१) क्षैक्षणीक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला ४) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ५) शासकीय अनुभव असलेले प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र ६) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र ७) पोलिस कार्यालयाचा चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दाखला इ. आवश्यक आहे.

| Interview criteria for other post | | | |
|---|---|---|---|
| Educational Qualification (Converted into 50%) | Additional Qualification (Converted in 20%) | Govt/Semi Govt/NHM Experience (each year 6 Marks maximum 30 Marks) | Out of total 100 Marks |
| 50 Marks | 20 Marks | 30 Marks | |

XXX
सदस्य सचिव
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद धुळे

XXX
अध्यक्ष निवड समिती
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धुळे